International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 5 May-June 2024

# विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य व तत्कालीन सामाजिक परिस्थितीबद्दल त्यांचे विचार

**अमित अशोक पाटील**
संशोधक विद्यार्थी
**Corresponding Author: अमित अशोक पाटील**
**Email:** aapatil9449@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14059300**

**प्रस्तावना:**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म १९७८ साली कर्नाटक मधील जमखिंडी या गावी झाला. १८८२ साली त्यांचा बालविवाह रुक्मिणी सोबत झाला. प्राथमिक शिक्षण जमखंडी संस्थानात पूर्ण झाले. दुसरी इयत्तेमध्ये असताना प्रथम क्रमांक आल्याने मॅट्रिक पर्यंत शिष्यवृत्ती मिळाली. १८९१ साली वी.रा. शिंदे हे यांनी मॅट्रिक उत्तीर्ण केले. त्र्यंबकराव खंडेराव यांच्यामुळे महर्षी वी.रा. शिंदे ना जमखंडी संस्थानात नोकरी मिळाली पण पुढील शिक्षणासाठी त्यांनी फरगुशन महाविद्यालयात १८९३ साली प्रवेश मिळवला. त्यांच्या शिक्षणासाठी गंगाराम भाऊ म्हस्के यांनी आर्थिक पाठबळ दिले. १८९५ साली त्यांनी इतिहास व कायदा ही विषय घेऊन बी.ए. साठी प्रवेश मिळवला. यासाठी दरमहा २५ रुपये स्कॉलरशिप बडोद्याची सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना देऊ केली. या कालावधीत त्यांचे शिक्षण चालू असतानाच ब्रिटिश अँड अमेरिकन युनिटेरियन असोसिएशनने आयोजित व्याख्यान मॅलेट डॉक्टर सदरलँड यांनी दिलेल्या व्याख्यानामुळे ते उदार धर्माकडे आकर्षित झाले. तिथून पुढे त्यांनी सामाजिक सुधारणांचे व्रत अंगीकारले यामुळेच ते सामाजिक कार्याकडे वळले. १८९८ साली सातारा येथे प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. डॉक्टर भांडारकर यांच्या मदतीने ते इंग्लंडला गेले तसेच १९०१ साली अमेरिकेत जाऊन सर्व धर्मांचा तौकनिक अभ्यास करण्यासाठी वीरा शिंदे यांची निवड झाली. दोन वर्षे तिथे त्यांनी सर्व धर्माचा तौकनिक अभ्यास केला. व १९०३ साली अमस्टर डॅम येथे जागतिक धर्म परिषदेत 'हिंदुस्थानातील उदार धर्म' हा निबंध वाचला. अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ज्ञान उपासना करत राहिले परिणामी त्यांची सामाजिक व्यवस्थेकडे पाहण्याची प्रवृत्ती बदलली. त्यांचे विचार पुरोगामी व प्रगल्भ बनले. पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांनी मूलभूत स्वरूपाचे समाज सुधारणांचे कार्य केले. तसेच अनेक संस्था उभारून संस्थात्मक कार्याला सुरुवात केली. त्यांचे मूळ मात्र मुख्यता धर्मप्रसारक व तत्त्वचिंतक होते. त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य हाती घेतले व पूर्ण कुटुंबासह त्यांनी स्वतःला वाहून घेतले. अस्पृश्यता अनुभवण्यासाठी त्यांनी कुटुंबासहित परगण्याच्या महार वस्तीत वास्तव्य केले. अशाप्रकारे त्यांनी विचार व कृती यांचा सुरेख संगम साधून समाज सुधारण्याच्या कार्याला वाहून घेतले. अशा या थोर समाज सुधारकाच्या कार्याची समर्पकता व व्याप्ती आपण पुढे पाहणार आहोत.

**उद्दिष्टे:**

१. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याची समर्पकता पटवून देणे.
२. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रार्थना समाजाच्या प्रसारासाठी दिलेल्या योगदानाची चर्चा करणे.
३. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृश्यता उद्धाराच्या कार्यावर प्रकाश टाकणे.
४. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे जीवनकार्य समजून घेणे.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावर पुढील व्यक्ती व ग्रंथ यांचा प्रभाव होता.**

**त्र्यंबकराव खंडेराव या शिक्षकाचा प्रभाव:**

गो.ग.आगरकर, हरिभाऊ आपटे, जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर, कार्ल मार्क्स, न्यायमूर्ती रानडे, मॅक्सम्युलर, महात्मा गांधी, जे.एस.मिल यांच्या ‘लिबर्टी’ व ‘Subject of Women’ या ग्रंथाचा प्रभाव.

स्पेन्सर ‘Education Introduction On The Sociology’ ग्रंथाचा प्रभाव

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे लिखित ग्रंथ**

- माझ्या आठवणी व अनुभव आत्मचरित्र
- बहिष्कृत भारत
- The problem of untouchable India
- हिस्टरी ऑफ परीहार्स
- डिस्टिक डिरेक्टरी
- Theists confession of faith
- हिंदुस्थानातील उदार धर्म
- महात्मा फुले यांच्यावर पोवाडा
- विविध लेख
- स्त्रियांच्या सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह
- मराठ्यांच्या पूर्वपिटिखा
- गुन्हेगार जातीचे सुधारणा
- ब्राह्मण ब्राह्मनेत्तर वाद
- सांगीय ऐक्याला तडा
- भागवत धर्माचा विकास

अशा प्रकारच्या विविध ग्रंथ व लेखांच्या माध्यमातून तत्कालीन सामाजिक परिस्थिती विरुद्ध विठ्ठल रामजी शिंदेने बंड पुकारले.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य**

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य**

१९०५ साली अहमदनगर जवळील भिंगार या खेड्यात अस्पृश्यांसमोर अस्पृश्य उद्धारासाठी झटनेची प्रतिज्ञा शिंदेनी केली. या कार्यात त्यांना त्यांच्या भगिनी जनाक्का यांची मोलाची मदत झाली. त्यांनी रुपी फंड, कापड फंड, तांदूळ फंड असे उपक्रम राबवले. पुण्यात फरग्यूशन कॉलेजमध्ये अस्पृश्य-ब्राह्मण यांच्यात एकत्र स्नेहभोजनाचा कार्यक्रम राबवला. १९१८ साली सयाजीराव गायकवाड व १९२० साली महात्मा गांधी यांचे अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद भरवली.

**ती प्रेस द क्लासेस मिशन (भारतीय निराश्रीत सहाय्यकारी मंडळी)**

या संस्थेची स्थापना विठ्ठल रामजी शिंदे यांनी केली. शिंदेने पुढील उद्देश ठेवून या संस्थेची स्थापना केली (१९०६)

- शिक्षण प्रसार करणे.
- सामाजिक अडचणीचे निवारण करणे.
- अस्पृश्यांसाठी वस्तीगृह चालवणे.
- नोकरी मिळवून देणे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला प्राथमिकता दिली. हे कार्य अत्यंत कष्टपद होते कारण अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर धार्मिक रुढी, प्रथा, परंपरा, आचरण बंद करणे अत्यंत निकडीचे होते. त्याचमुळे त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य संस्थात्मक पातळीवर नेले. अस्पृश्यता निवारणासाठी फक्त विठ्ठल रामजी शिंदे एकटेच झटले नाहीत तर त्यांचं पूर्ण कुटुंब अस्पृश्यता निवारणासाठी झटले. त्यांच्या वडिलांनी हिशोब पाहण्याचे काम केले, आईने अस्पृश्य लहान मुलांचे संगोपन केले, बहिण जनाक्का यांनी अस्पृश्य स्त्रियांची सेवा, सुश्रुषा केली, त्यांची दुसरी बहीण कन्याक्का यांनी क्षय रोगांची सेवा केली. त्यातच त्यांना क्षय रोगाचे लागण झाली व त्यांचा त्यात मृत्यू झाला. अशाप्रकारे संपूर्ण कुटुंब अस्पृश्यता निवारणासाठी झटले. संपूर्ण हिंदुस्थानात हे असे एकमेव उदाहरण असेल.

**प्रार्थना समाज व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे:**

१८६७ साली मुंबई येथे केशव चंद्रसेन यांच्या प्रेरणेने प्रार्थना समाजाची स्थापना झाली. १८९८ साली विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली व प्रार्थना समाजातर्फे त्यांना सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी १९०१ साली त्यांना अमेरिकेला पाठवले. १९०३ साली ती अमेरिकेहून परत आले व त्यांनी प्रार्थना समाजाचे धर्मप्रचारक म्हणून आपल्या जीवन कार्याला प्रारंभ केला. पत्रकांद्वारे धर्मप्रचार करण्यासाठी पोस्टल मिशनच्या स्थापनेला प्रेरणा देऊन पुढे त्यांनी ते स्वतः चालवले.

**वायकोम सत्याग्रह १९२४ :**

१९२३ साली महर्षी विठ्ठल रामजी शिंदे क्लासेस मिशन म्हणून निवृत्त झाले. १९२४ साली ते ब्राह्मो समाजाचे आचार्य म्हणून दक्षिण भारतात गेले. तिथे गेल्यावर श्रावण कोर संस्थानात वायकोम या गावात मंदिरात इजा करण्यास अस्पृश्यांना सक्त मनाई होती. तेथील अस्पृश्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडली व त्यांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळवून दिला.

**स्त्री विषयक कार्य आणि विठ्ठल रामजी शिंदे :**

विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य उद्धाराबरोबरच तत्कालीन समाजातील स्त्रीविषयक समस्यांचे आकलन केले व स्त्रियांना सामाजिक कुप्रथा, रुढी, परंपरा यापासून मुक्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यासाठी त्यांनी संस्थात्मक प्रयत्न केले. १९०७ साली त्यांनी निराप्रीत महिला समाज ही संस्था स्थापन केली. या संस्थेतील सुशिक्षित स्त्रिया घरोघरी जाऊन शिक्षणाबद्दल व आरोग्य बद्दल जागृती पसरवत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व जनाक्का समाज प्रबोधन करत होते. स्त्री-पुरुषात समानता असावी भावनिक ऐक असावी यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी खूप मोठ्या प्रमाणावर संघटित प्रयत्न केले. तशीच मुरळी प्रथा बंद करण्यासाठी सुद्धा त्यांनी प्रयत्न केले.

**शेतकरी चळवळ आणि विठ्ठल रामजी शिंदे:**

तत्कालीन समाजात शेतकरी वर्गाची स्थिती अत्यंत हलाखीची व दयनीय कर्जबाजारी झाली होती. शेतकरी वर्गाचे हाल अपेष्टा विठ्ठल रामजी शिंदे यांनी अनुभवल्या त्यांनी शेतकऱ्यांना दैनिक परिस्थितीमधून बाहेर काढण्यासाठी विविध मार्गांचे अनुसरण केले. १९२६ ते १९३२ शेतकरी परिषदा भरून अध्यक्षपद स्वीकारून शेतकरी स्थिती सुधारावी यासाठी उपाय सुद्धा योजले.

१. अस्पृश्यांची शेतकरी परिषद, पुणे १९२६
२. मुंबई इलाच्या शेतकरी परिषद, पुणे १९२८
३. वाळवे तालुका शेतकरी परिषद, बोरगाव १९३१
४. संस्थानी शेतकरी परिषद, तेरदाळ १९३२
५. चंदगड तालुका शेतकरी परिषद १९३२

अशाप्रकारे शेतकरी परिषदा भरून शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले.

**विठ्ठल रामजी शिंदे व स्वातंत्र्य चळवळ :**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे महात्मा गांधी यांच्या विचारसरणीवर चालणारे एक समाज सुधारक होते तेही अहिंसावादी होते. तसेच १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. त्यामुळे त्यांना तुरुंगवासीही भोगावा लागला.

**मूल्यमापन:**

विठ्ठल रामजी शिंदे यांनी समाज सुधारणा, अस्पृश्यता निवारण, स्त्री सुधारणा, शिक्षण प्रसार, धर्मप्रसार या विविध क्षेत्रांमध्ये सामाजिक कार्य करून पुरोगामी समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांची जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला, शिक्षण प्रसार करून समाज साक्षर करण्याचा प्रयत्न केला, प्रार्थना समाजाचे कार्य

करून धर्मातील अनिष्ट रूढी, प्रथा - परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, स्त्री-पुरुष समानतेसाठी संघटनात्मक प्रयत्न केले, डिप्रेस्ड क्लासेसच्या माध्यमातून दलित, शेतकरी, स्त्रिया, वाईट प्रथा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात कार्य करून समाजातील तळागाळातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला. अशा या थोर समाजसेवकाची २ जानेवारी १९४४ या दिवशी निधन होऊन संपूर्ण देश अशा कर्त्या समाजसुधारकाला मुकला.

**संदर्भ ग्रंथ :**

१. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास १८१८ - १९६०, प्राचार्य एस एस गाठाळ, कैलास प्रकाशन.
२. वी.रा.शिंदे : राजकीय, सामाजिक विचार, तानाजी ठोंबरे, स्नेहवर्धता प्रकाशन, मुंबई.
३. वी.रा.शिंदे : आर्थिक, सामाजिक विचार, पी. डी. दिघे, लोक वाङ्मय गृह, मुंबई.
४. निवडक विठ्ठल रामजी शिंदे, संपादक गो.मा. पवार, साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली.